ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

PERIODIC TEST – 3 (2023 – 24) Date:

M.M: 40 Class IX Marathi Time: 90Min

Marathi- Aksharbharti(L-8,11,13,RR-2)

प्रश्न क्र.1) पुढील अपठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

जन्माला आल्यानंतर जीवन जगत तर काय सगळेच असतात; पण जगत असताना तुमचा उद्देश काय हे महत्त्वाचे! पिंडी ते ब्रम्हांडी याच न्यायाने हे गृहीतक सर्वांनाच लागू पडते. नसेल तर लागू करायला पाहिजे. कारण उद्देश सोडून केलेले काहीच सार्थकी लागत नाही.

म्हणजे बघा की एखादी आई स्वयंपाक करते. का? तर घरातील सर्वांचे केवळ पोट भरावे म्हणून नाही; ते तर आहेच पण, खाल्लेलं घरातील सर्वांच्या अंगी लागावं. सगळ्यांचे व्यवस्थित पोषण व्हावं..कोणी उपाशी पोटी राहू नये.. कोणी आजारी पडू नये.. पोरं अंगापिंडाने दिसामासाने चांगली वाढावी. या उद्देशाने ती स्वयंपाक करीत असते. अन्नपूर्णा घरातील सर्वांची रसना तृप्त करीत असते; करत राहते; निरंतर. तिला माहीत नसतं आपल्या कष्टाची कोणी नोंद घेणार आहे का नाही पण निरपेक्षतेने ती सर्वांचें सर्व करीत राहते. उद्देश स्वच्छ असतो "निरपेक्ष कर्तव्यपूर्ती"!!

एखादवेळेस आपल्या मुलाला धपाटा घालते त्यामागे पण त्याला काही इजा व्हावी म्हणून नाही किंवा मनात प्रचंड राग-द्वेष-मत्सर असतो म्हणून नाही तर त्याने जी काही चूक किंवा घोडचूक केली असेल ती पुन्हा कधीही करू नये म्हणून!

हा विषय कशावरून घेतला लिहायला? तर कॉलेजमध्ये शेवटच्या परीक्षा चालू आहेत. ड्युटी संपली की ग्रंथालयात जायला थोडा वेळ मिळतो. तसा आज पण मिळाला. पण मी फ्री झाले असले तरी ग्रंथालयाच्या बाईंना ड्युटी लागली होती त्यामुळे ग्रंथालय बंद करून त्या गेल्या. अर्थात चावी त्यांच्यापाशीच होती. मी चावी मागायला गेले. तर सरळ नाही म्हणाल्या. स्वाभाविकपणे थोडा वेळ राग मिश्रित मन खट्टू झालं. का ह्या अशा वागल्या आपण रोजचेच तर आहोत..एवढी पण जबाबदारी आपल्याला कळत नाही की काय? जाऊदे कोणाकोणाला असते सवय स्वत:चा टेंभा मिरवायची..असे एक न दोन बरेच नकारात्मक विचार मनात थैमान घालून गेले. इगो दुखावला गेला होता ना, मग हेच होणार होतं.

काही वेळाने डोकं (की मन?) थंड झाल्यावर 6-9 थिअरी आठवली. म्हटलं आपण विद्यार्थांना शिकवतो ही थिअरी समजून घ्यायला व वापरायला. तर आपण पण आधी वापरून पहायला पाहिजे. तेव्हा लक्षात आलं की ग्रंथालयाच्या बाईंनी चावी का दिली नाही ते! मला दुखवायचा त्यांचा हेतू नव्हता. ग्रंथालयाची संपूर्ण जवाबदारी त्यांची आहे. न जाणो काही विपरीत घडलं तर त्यांनीच उत्तर देणं अपेक्षित आहे. आपण काय सॉरी म्हणून मोकळे होऊ. सिक्स - नाईन थिअरी आपल्याला हेच शिकवते. तुम्हाला समोरच्याच्या बाजूला जाऊन त्याची बाजू समजून घ्यायला लागते; नाहीतर संघर्ष ठरलेला! मग तो दोन व्यक्ती- व्यक्ती मधला असो की व्यक्तीचा स्वत:शी असो.

1) पिंडी ते ब्रम्हांडी याच न्यायाने हे .......सर्वांनाच लागू पडते.
   (उद्देश / गृहीतक/ विचार)
2) अन्नपूर्णा घरातील सर्वांची ......तृप्त करीत असते.
   (रसना / भूक / तहान / गोडी)
3) डोकं (की मन?) थंड झाल्यावर .......थिअरी आठवली
   (सिक्स - नाईन / नाईन- सिक्स /फिक्स -नाईन)
4) आई मुलाला धपाटा का घालते? (इजा व्हावी म्हणून /मनात प्रचंड राग-द्वेष-मत्सर असतो म्हणून / चूक केली असेल ती पुन्हा कधीही करू नये म्हणून)
5) चावीसाठी कोणी नकार दिला?
   (मुख्याध्यापकांनी /वॉचमनने/ ग्रंथालयाच्या बाईंनी /शिपायाने)

प्रश्न क्र.2) खालील प्रश्नांसाठी योग्य उत्तराचा पर्याय निवडा(कोणतेही 9) 9

1. सखुआजीचे वय किती होते? (९० / ८० /७५)
2. आधुनिक काळात पक्ष्यांच्या स्थलांतराची माहिती देणाऱ्या गोष्टी....
   (दूरदर्शन /रडार यंत्रणा /मोबाईल टॉवर)
3. केरळचा रानपरीट कुठे सापडला होता? (ब्रह्मदेशात /जर्मनीत /बिकानेरमध्ये)
4. कोणता पक्षी एवरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे सत्तावीस हजार फुटापर्यंत आल्याची नोंद आहे? (हिमयाक / हिमकाक /श्वेत बलाक )
5. लेखकाला सखु आजी ..... वाटते (थकलेली /कविता /अहंकारी)
6. सातबा घोरपड्याच्या मुलाने कोणती चूक केली म्हणून त्याला शिक्षा होणार होती?
   (चाकबंदी मोडली /गावच्या लक्ष्मी जत्रेत नाचला / गावाबाहेरून वस्तू घेऊन आला)
7. हिवाळ्याच्या सुरुवातीला......... या खंडातून भारतात पक्षी येतात
   (युरोप /ऑस्ट्रेलिया /अमेरिका)
8. सखू आजी किती दिवसात वाचायला शिकली? (१७ /१५ /८ )
9. सखू आजीने कोणाला सहीपुरते साक्षर केले? (लेखकाला /सरपंचाला /सातबाला)
10. सूर्य............ झुकू लागला, की काही पक्षांचे मन उचल खाते व ते अन्न उपलब्ध असून सुद्धा स्थलांतर करतात. (दक्षिणेकडे /उत्तरेकडे /पूर्वेकडे)

प्रश्न क्र.3) प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणताही एक) 3

1. फक्त अॅल्युमिनियमचेच वाळे पक्ष्यांच्या पायात का अडकवतात?
2. पक्ष्यांच्या स्थलांतराची वैशिष्ट्य कोणती?

प्रश्न क्र.4) कंसातील सूचनेप्रमाणे बदलून लिहा. (कोणतेही दहा) 10

1. समानार्थी लिहा- जल , चंद्र, , पवन (कोणतेही दोन)
2. विरूद्धार्थी करा- खरे, आनंद, वर (कोणतेही दोन)
3. लिंग बदला- बैल, कवयित्री, राणी (कोणतेही दोन)
4. वचन बदला- खुर्ची, पिशवी, आकाश (कोणतेही दोन)
5. दारोदारी - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
6. चहापाणी- या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा
7. पंचारती - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
8. क्रियापद ओळखा- काल विमल मैदानात धावताना पडली.
9. क्रियाविशेषण अव्यय ओळखा- पूर्वी नियमित पाऊस पडत होता
10. केवलप्रयोगी अव्यय शोधा- अरे वा! एवढे सुंदर चित्र कधी काढलेस!
11. विशेषण ओळखा- बिळातून छोटा उंदीर बाहेर आला, सापाने त्याला पकडले.
12. वर्तमानकाळ करा - संदीप सहलीला जाईल.
13. काळ ओळखा- अर्जूनाने माशाचा डोळा फोडला.
14. वाक्याचा प्रकार ओळखा - मुलांनो, सकाळी प्रार्थना म्हणावी.
15. उदगारवाचक करा- तलावात खूप सुंदर राजहंस पोहत होता.

प्रश्न क्र.5) पुढील पठीत कविता वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते
नंदीबैलाच्या जोळीले सदाशिव हाकालते

वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
त्यात तानुले लळते ढग बरसते

काकरत बिजवाई जस हासरं चांदनं
धरतीच्या अंगोपांगी लाळानौसाच गोंदनं
सरीवरी सरी येती माती न्हातीधुती होते
तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते
भूल जीवाले पाळते वाट सांजीले पाहेते
मैना वाटुली पाहेते राघू तिफन हानते
राघू तिफन हानते ढग बरसते

1) काळ्या मातीत कोणते अवजार चालते?

2) ढग ढोल वाजवते म्हणजे काय?

3) शेतात काम करताना शेतकरणीने मुलाला कुठे ठेवले आहे?

4) कस्तुरीचा वास भूल जिवाले पाळते, या ओळीतील कस्तुरीचा वास म्हणजे काय?

5) या कवितेत मैना व राघू हे शब्द कोणासाठी वापरले आहेत?

प्रश्न क्र.6) खालील काव्य ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतीही एक) 3

1)काटा पायात रूतते।लाल रगत सांडते।हिर्व सपन फुलते।।

2)काकरात बिजवाई जस हासर चांदन।। धरतीच्या अंगोपांगी लाळानौसाच गोंदनं।।

प्रश्न क्र.7) पुढील कोणत्याही एक प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा 2

1. विश्वकोशाचा उपयोग लिहा
2. विश्वकोशाची निर्मितीप्रक्रिया सांगा

प्रश्न क्र.8) खालील कोणताही एक लेखन प्रकार सोडवा 5

1. निबंध-<u>मी शिक्षक झालो तर</u> - माझे आजचे शिक्षक- मला शिक्षक का व्हायचे?- माझी शिकवण्याची पद्धती- खेळातून अभ्यास- प्रोजेक्टमधून विषय समजावणे- टॅबवर संपूर्ण अभ्यासक्रम- पुस्तक ओझे नाही- परीक्षा ऑनलाईन- घरी बसून विद्यार्थ्यांना शिकवणे- शंका समाधान- पालकांशी संवाद व मदत- वर्षातून चारवेळा शाळेबाहेर अभ्यास पिकनिक- पाठाचे नाट्यरूपांतर- कलाकार,पत्रकार, चित्रकार, लेखक, वैज्ञानिक, उद्योजक घडविण- समारोप
2. कथा- एका नगरात एक साधू - त्याच्याजवळ एक माणूस येतो - साधू त्याला उपदेश करतो - प्रत्येक प्राण्यांत व माणसांत परमेश्वर असतो - तो माणूस रस्त्यावरून जातांना त्याला हत्ती दिसतो - हत्ती सैरावैरा पळत होता - हत्तीवरील माहूत जोरजोराने ओरडत होता - 'पळा, पळा' हत्ती माजलेला आहे-मनुष्य हत्तीत परमेश्वर आहे म्हणून तो त्याच्या समोर जातो - दूर फेकला जातो - साधूला जाऊन सांगतो, हत्तीच्यात परमेश्वर नव्हता - साधुने परत उपदेश देणे - माहुताचा परमेश्वर तुला ओरडून सांगत होता, तो दिसला नाही का?- तात्पर्य
3. पत्रलेखन- आयुश विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी सुरज गोडबोले गंधर्व स्पोर्ट्स डेपोमधून खेळाच्या साहित्याची (sports materials) मागणी करत आहे.

xxxxxxxx